**प्रेस नोट दिनांक २५/०६/२०१९**
**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**गहाळ झालेली स्कुटर शोधुन दिलेबाबत.**

चंदननगर पो.स्टे. चे हद्दीमध्ये प्रविण सेल्स, चंदननगर, पुणे येथे इसम नामे मनोज खोचणे रा. वाघोली, पुणे यांनी त्यांची ॲक्टीवा गाडी नं. एमएच १२ ईएस ६०६९ ही तीचे डिकीमध्ये मोबाईल व रोख रक्कम असलेले पाकीट असे असलेले गाडी कोणीतरी चोरुन नेले बाबत माहिती शिवराणा पोलीस चौकी येथे पोहवा लतीफ पठाण यांना दिली असता त्यांनी लागलीच घटनास्थळावर जावुन पाहणी करता मनोज खोचणे यांचे ॲक्टीव्हा गाडी सारखी दुसरी ॲक्टीव्हा स्कुटर नं. एमएच १४ बीएफ १४३३ ही तेथे मिळुन आली सदर स्कुटरची माहिती काढुन सदर स्कुटर ही महिला नामे सौ. शुभलक्ष्मी रामकृष्णन रा. न्याती मिडोज सोसायटी, चंदननगर, पुणे यांची असल्याचे सांगुन त्यांनी इसम नामे मनोज खोचणे रा. वाघोली, पुणे यांनी त्यांची ॲक्टीवा गाडी नं. एमएच १२ ईएस ६०६९ ही नजरचुकीने चावी लागल्याने नेल्याचे सांगुन ती चौकीस आणुन दिली असुन इसम नामे मनोज खोचणे रा. वाघोली, पुणे यांना खराडी चौकी येथे समक्ष बोलावुन सदरचा स्कुटर गाडी त्यामधील मोबाईल, पाकीट पैसे त्यांना ताब्यात दिले आहे.

सदर इसम नामे मनोज खोचणे रा. वाघोली, पुणे यांचे स्कुटर गाडी व त्यामधील मोबाईल, पाकीट पैसे हरविल्याने ते दुखीः झालेले होते परंतु त्यांचा ते परत मिळवुन दिल्याने त्यांना आनंद होवुन, त्यांनी नमुद पोलीस कर्मचारी यांचे आभार मानुन पोलीस खात्याबद्यल आदराची भावना निर्माण झालेबाबत मनोगत व्यक्त केले आहे.

सदरची चांगली कामगिरी चंदननगर पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी वपोनि कृष्णा इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली कर्मचारी पोहवा लतीफ पठाण यांनी केलेली आहे.

